ebook

# वाह उस्ताद !..

## - तबलानवाज़ 'उस्ताद अल्ला रख्खाजी' (अब्बाजी)

लेखक - अनंत पावसकर



‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

# अनंत पावसकर

लिखित

# ‘वाह उस्ताद..!!’

## - तबलानवाज़ ‘उस्ताद अल्लाह रख्ख़ा’



© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)
anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर
**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**
**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**
**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**
**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफ़ू !**

## ♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी)**
**(जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)**

**अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष. ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).**

**इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना गुलमोहर नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० विविध अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.**

**मराठीतील पहिलं ई-बुक बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत आशीर्वाद पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या चार ई-बुक्ससह इतर अनेक ई-बुक्स सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते म्युझिक प्लॅनेट ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.**

**(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)**
**तबलानवाज़ 'उस्ताद अल्लाह रख्खा' ♥ © लेखक : अनंत पावसकर ♥ 'ई-साहित्य प्रतिष्ठान' तर्फे प्रकाशित.**

# वाह उस्ताद !!

## - तबलानवाज़ 'उस्ताद अल्ला रख्खाजी' (अब्बाजी)

★ लेखक : अनंत पावसकर

*... तबलानवाज उस्ताद अल्ला रखाँ! नुसते नाव उच्चारल्यावरही भल्याभल्यांचे हात कानाच्या पाळीकडे जातात आणि या महान कलाकाराचा तेवढेच महान पुत्र.. उस्ताद झाकीर हुसेन, उस्ताद तौफ़िक कुरैशी, उस्ताद फ़ज़ल कुरैशी या दिग्गज अशा.. जिनियस पिता-पुत्रांचा वेगवेगळा असा विचार करताच येत नाही. आत्ता.. म्हणजे मी मुलाखात घेतली होती त्या आनंददायी क्षणांचा विचार करता.. त्या दिवसात 'उस्ताद अल्ला रखाँजींच्या' वयाचा अमृतमहोत्सव साजरा करण्याची जोरदार तयारी करण्यात येत होती. मस्त 'कव्हर स्टोरी' करायची म्हणून.. ते औचित्य साधत.. त्या निमित्ताने या कलावंतांशी आणि त्यांच्या हसत्या खेळत्या घराशी, केलेलं एक हितगुज..*



मला तो दिवस आठवतोय! आणि.. उस्ताद झाकीर हुसेन यांना मुलाखतीसाठी गाठणं 'मुश्कील ही नही, नामुमकीन है' याचा खराखुरा प्रत्यय आला! हिन्दुस्थानी संगीतातल्या 'तबला' या तालवाद्याला जागतिक कीर्ती आणि आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त करून देणाऱ्या दिग्गजांमधील अग्रगण्य अशा 'उस्ताद अल्ला रखाँ कुरेशी' यांना येत्या २९

एप्रिल, १९९४ रोजी पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत म्हणून त्यांचा लाडका सुपुत्र आणि 'शागीर्द' उस्ताद झाकीर हुसेन, उस्ताद अल्लारखाँजींचा (अब्बाजींचा) अमृतमहोत्सवी सोहळा आगळ्यावेगळ्या पध्दतीने साजरा करतोय. या शृंखलेत आधी १५ जानेवारी रोजी 'रंगभवन, धोबीतलाव' येथे पहिला कार्यक्रम झालाही होता बरं! तसेच याच महिन्यात दुर्गापूर, हैदराबाद, कलकत्ता, नागपूर वगैरे ठिकाणी संगीत-जलसे सादर होणार आहेत, अशी चर्चा होती. केवळ हिन्दुस्थानातच नव्हे, तर वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, बोस्टन, टोरँन्टो, नॉर्वे, लॉस एंजिलीस, सॅन फ्रॅन्सिस्को, कॅनडा, फिलाडेल्फिया, ऑस्लो, पिटस्बर्ग तेथेही संगीत-मैफिली आयोजित करण्यात येणार होत्या! उस्ताद झाकीर हुसेन एका ध्वनिमुद्रणासाठी 'वेस्टर्न-आऊट डोअर' स्टुडिओत दिवसभर असणार आहेत म्हणता मी तिथेच भेट घ्यायचं ठरवलं. अब्बाजान, उस्ताद अल्लारखाँही आवर्जून उपस्थित होते आपल्या 'शागीर्द'च्या रेकॉर्डिंगला! झाकीरभाईंशी 'व्हीनस' मुळे जानपहचान होतीच. त्याने अब्बाजानशी ओळख करून दिली. भूतकाळावरचा पडदा हलकेच दूर होऊ लागला..

'अब्बाजान, आप का क्या ख़याल है.. या नियोजित अमृतमहोत्सवाविषयी.. ?'

'बेटा, मला खरंतर याची गरजच वाटत नव्हती.. वाढदिवस कधीच साजरे केले नव्हते मी.. आता मुलांच्या आग्रहाखातर नाही म्हणणंही आता प्रशस्त वाटत नाहीय..'

झाकीरजींनी त्यांना इशाऱ्याने मध्येच थांबवत म्हटलं.. 'देखो भाई.. अल्ला रखाँजी माझे केवळ अब्बाजान आहेत म्हणून त्यांचा हा सन्मान वगैरे करत नाहीय.. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीताच्या प्रभावळीत आज त्यांचं नाव उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब, उस्ताद विलायत खाँसाहेब, पं. भीमसेनजी, पं. जसराजजी, पं. रविशंकरजी अशा अफाट कर्तृत्वाच्या दिग्गजांच्या पंक्तीत सन्मानानं घेतलं जातंय. या प्रभृतींनी शास्त्रीय संगीतात फार मोठी कामगिरी केलीय. जगाच्या कानाकोपऱ्यात नेलीय आपली ही हिन्दुस्थानी अभिजात कला! इतिहासात सुवर्णाक्षरांनी नावं लिहिली जाणार आहेत या अनुपमेय कलाकारांची. या कलेलाच आमचा हा मानाचा मुजरा आहे. अब्बाजानसह सर्वच बुजुर्गांना प्रसिध्दीची हाव कधीच नव्हती. आयुष्याच्या या टप्प्यावर आमचे अब्बाजान आज पूर्णतः तृप्त आहेत. समाधानी आहेत. या वयातही त्यांच्यात तबलावादकांची एक नवी पिढी निर्माण करायची पराकोटीची जिद्द आहे. अशा या उत्स्फूर्त प्रतिभेला 'कुर्निसात' म्हणूनच आम्ही मुलं हा अमृतमहोत्सव साजरा करतोय. आमचा 'गुरुप्रणाम' आहे तो. 'गुरुदक्षिणा' आहे ती! देणं लागतो आपण सर्व त्यांच्या कार्याचे, प्रगल्भ प्रतिभेचे..!'

'अब्बाजान, आपण आपली कलासाधना नेमकी कशी केलीत.. ?' अब्बाजान बोलू लागले..

' बेटा.. मी मूळचा जम्मूचा. जम्मूतलं 'फगवाल' हे आमचं गाव. जन्म तारीखच सांगायची तर २९ एप्रिल, १९१९. शनिवार होता म्हणतात. आमच्या घरची परिस्थिती तशी यथातथाच होती. 'डोगरा' रियासतच्या खानदानातलं आमचं घराणं! 'डोगरी' हीच आमची मूळ मातृभाषा. घरची शेतीवाडी आहे. दुसऱ्या महायुध्दात माझ्या नात्यातले बरेच लढवय्ये होते. माझे इतर सहा भाऊ शेती वा तत्सम कामात मसरूफ असायचे. का कुणास ठाऊक, मी मात्र त्यांच्यापासून थोडा अलिप्तच असायचो. कलेकडेच माझा ओढा होता. गावात बऱ्याच नाटक कंपन्या यायच्या. त्यांच्यातल्या कलेविषयी खूप

कुतुहल वाटायचं. गाण्यांबद्दलही तसंच! कुठे चांगलं ऐकायला मिळतंय का ? यासाठी सदान्‌कदा आसुसलेला असायचो. 'गंधर्व महाविद्यालय' नावाची संस्था लाहोरमध्ये आहे यातूनच समज काय ते! पठाणकोट जवळच्या रतनगढला अशाच एका नातेवाईकाकडे गेलो होतो. मनात विचारांचं चक्रीवादळ होतं. तुला सांगू... ? अकरा वर्षांचा असेन मी तेव्हा. १९३० साल असेल ते! डोक्यात कलेचं जबरदस्त खूळ होतं! रतनगढच्या नातेवाईकांच्या घरी, लाहोरच्या काकांकडे जातोय असं सांगून सरळ गुरुदासपूरच्या रस्त्याला लागलो. वाहतुकीची साधनं नव्हती तेव्हा. मजल दरमजल करत बऱ्याच दिवसांनंतर लाहोरला चक्क पायीच पोहोचलो. लाहोरच्या काकांनी आश्चर्यमुग्ध होत स्वागत केलं. नंतर मी काकांना माझा मनसुबा सांगितला. ते काही प्रयत्न करतो म्हणाले. त्यांच्या घराजवळच 'उस्ताद मियाँ कादर बक्षसाहेब' हे हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातल्या पंजाब घराण्यातले अग्रणी राहत होते. मी त्यांनाच आपला गुरू मानले. माझी मंजील मला मिळाली. थोडे दिवस गावात काही कामे करून शिकायला लागलो आणि नंतर दोनेक वर्षांनी शिष्यत्वाचा गंडाच बांधून गुरूंकडे पूर्ण वेळ रहायला लागलो. माझ्यातली 'तबलावादन' ही कला, ही या गुरूंचीच देन आहे. असेच दिवस जात होते. लहानमोठ्या कार्यक्रमांतून हजेरी लावता लावता मला 'ऑल इंडिया रेडिओ-लाहोर' इथे नोकरी मिळाली. आवाजाची देणगी असल्याने पतियाळा घराण्याशी ताल्लुक असलेल्या 'उस्ताद आशिक अली खाँसाहेब' यांच्याकडे गाणं शिकलो. सरावाने हार्मोनियमही उत्कृटरित्या वाजवता येऊ लागला. सततच्या रियाजाने संगीतातले बरेच संवादी सूर माझ्या बोटात उतरले. पारंपरिक गुरू-शिष्य परंपरेला अनुसरून अविश्रांत मेहनतीने मी ही कला हासिल केलीय. माझ्या गुरूंची परंपरा किती मोठी आहे ठाऊकेय? (कानाच्या पाळीला हात लावत) थेट अकबर बादशाहच्या दरबारातल्या 'तबलानवाज पं. लाला भवानीदासजीं' पासून! लाहोर आकाशवाणीत सहा वर्षे काढल्यावर माझ्या 'ऱ्हिदम' आणि 'मेलडी' या दोन्ही शाखांतलं प्रावीण्य जोखून आकाशवाणीने माझी दिल्ली आणि नंतर मुंबईला बदली केली. १९३८च्या सुमारास मी मुंबईला आलो. माझ्या स्वप्नातला स्वर्ग मला या इथेच गवसला! संधी होती! प्रोत्साहन होतं..! माझी कलेची क्षितिजं विस्तृत आणि तेजोमय होण्याची चिन्हे दिसू लागली. १९४३ साली माझ्या नात्यातल्याच 'बावी बेगम' नावाच्या मुलीशी माझा निकाह झाला. झाकीर हा खुर्शीद आणि रझिया या दोन मुलींपाठचा! झाकीर पाठचे फजल आणि तौफ़िक! फजल हासुध्दा अतिशय उत्तम तबलावादक आहे, बरं! माझा तौफ़िक 'म्युझिक अरेंजर'चं काम करतो. झाकीरचा जन्म शुक्रवार, ९ मार्च १९५१चा.. आजारीच होतो मी तेव्हा..!!'



‘आजारीऽऽ!’ झाकीर मध्येच अब्बाजानचं बोलणं तोडत म्हणाला.. ‘अरे, केवळ आजारी नाही.. अंथरूणालाच खिळलेले होते. अम्मी सांगते ना! माझ्या जन्मानंतर जादूची कांडी फिरवावी त्याप्रमाणे हळुहळू बरे होत गेले! मुलींचा ओढा वडिलांकडे तर मुलांचा ओढा हा बहुदा आईकडे असतो असं म्हणतात ना! पण का कुणास ठाऊक.. माझ्या आणि अब्बाजानच्या जीवनात एक अदृश्य अशा तारेचं बंधन आहे.. ‘जैसै चोली-दामन का साथ हो.. ’ आठवण सांगायची तर.. अब्बाजान मी पोटात असताना ‘आपल्याला मुलगाच होणार!’ अशा खात्रीने आनंदाच्या क्षणी तिच्या ओटीपोटावरच तबल्याचे ताल देत ओठातून तबल्याचे बोल, रागिण्या म्हणायचे, असं अम्मीजान म्हणत असे. अर्जुनाने अभिमन्यूला चक्रव्युहाचे धडे दिले यासारखंच वाटतं नाही का? (हसत..) अम्मीजान सांगायची.. मी अवघ्या दोन दिवसांचा असताना हाफिजींनी (मस्जीदमधील पौरोहित्यासारखे काम करणारे मुल्लाजी!) माझ्या कानात ‘अज़ान’(बाँग, नमाज पढण्यासाठी निमंत्रण, ‘परवर दिगार’ खुदाचं स्वागत.. स्तोत्र?!) म्हटल्यावर अल्लातालाने आपल्या ओंजळीत दिलेली ती ‘नियाज़’ (कृपा, प्रसाद, उपहार!) समजून बाबांनी, मला हळुवारपणे हातांवर तोलत जवळ घेतलं. आमच्यात अशावेळी बाळाच्या कानात कुराणातील भक्तिरसपूर्ण आयत (ओव्या!) म्हणण्याचा प्रघात आहे..! पण अब्बाजाननी काय केलं माहित्येय? माझ्या कानात त्यांनी चक्क तबल्याचे बोलच ऐकवले म्हणे!.. तू एक काम कर.. अब्बाजानबरोबर अस्साच आमच्या घरी जा.. मस्त मैफल जमेल..! बघच तू..! अब्बाजान तसे मितभाषीच आहेत म्हणा..! पण सोबत गप्पा मारायला अम्मी आणि खुर्शीदआपा असतील ना! तर तुला मस्त गमतीजमती ऐकायला मिळतील..! इथे फक्त प्रश्नोत्तराचाच तास होईल.!’ आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन!.. तसं झालं की हो! मी लगेच अब्बाजानबरोबर त्याच्या घरी निघालो. सिमला हाऊस! नेपियन सी रोडवरची ती उत्तुंग इमारत.. अल्लारखाँजींचा प्रशस्त फ्लॅट! घरात बऱ्याच बच्चेकंपनीचा कलकलाट सुरू होता. अथांग समुद्र दिसेल अशा बाल्कनीत आमची बैठक जमली. अम्मीजान, खुर्शीदआपा, रझियाआपा. फजल आणि तौफिकभाई! अल्लारखाँजींनी सर्वांशी माझी जुजबी ओळख करून दिली.. आणि निवांत गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात आठवणींच्या बंद कप्प्यांची कवाडं अलगद उघडू लागली. मध्येच अम्मीजानने खारी-बिस्किट आणि चहा.. अगदी आपलेपणाने आणून दिला. सुरुवात झाकीरवरूनच झाली. इतर वेळी ध्यानस्थ, अबोल आणि गंभीर प्रकृतीचे अब्बाजान खुलवताच कसे बोलतात किंवा किती खळाळून हसू शकतात हे पुरेपूर अनुभवलं मी! लाडक्या झाकीरचा विषय म्हणता अम्मीजानही खूपच खूश झाल्या होत्या!

‘बेटा, ये झाकीर है ना.. शरारती शैतान होता लहानपणी.. और हे सगळं इनके लाड-प्यार की वजह से! तुमने एक महिने के नन्हेसे बच्चेको कभी गौर से देखा है? दुधाची बाटली कशी घट्ट पकडून दूध पितात, होय ना? झाकीर काय करायचा माहित्येय? दूध पितापिता हाताची बोटं बाटलीवर सतत आपटत असायचा. पायांनाही थारा असेल तर शपथ! जणू सायकलची रेस लागलीय की काय..! त्याला कुशीत पाजायचं म्हणजे दिव्यच. सारखी मस्ती..! बोटं सतत हलती असायची! जणू तो आपल्या इवल्या-इवल्या हातांनी तबल्याचा लेहराच वाजवतोय! जरा कुठे चालायला लागताच हातात लाटणं, पट्टी काय मिळेल ते घेऊन सोफ्याच्या कडा, भिंती, कशावरही ताड्-ताड् आपटत रहायचा! दोन-तीन वर्षांचा

होईपर्यंत त्याने घरातलं एकही भांडं सोडलं नाही. तपेली, हंडा, कळशी, पितळी डबे जे काही मिळेल त्यावर लाटणं, डाव, चमचे वाजवत पोचे पाडून खराब केलीत भांडी! आमच्या खानदानात कुणी डॉक्टर, इंजिनियर नव्हते.. म्हटलं हा शिकेल, मोठा होऊन डॉक्टर होईल..!' अब्बाजान मध्येच म्हणाले..'उसमें बातही और थी. सतत माझ्याजवळ असायचा तो. आपण मुलांना उचलून घेऊन छातीवर रेलवून थोपटतो ना तेव्हा अंगाई गीतांऐवजी मी त्याला तबल्याचे बोल ऐकवायचो. मी थकून जरासा थांबताच पठ्ठा ताड्कन मान उचलून माझ्याकडे पहायचा.. जणू 'थांबलात का? म्हणा ना!.' असेच सुचवायचा त्यातून. वयाच्या चौथ्या वर्षी त्याला मी रितसर शिकवायला लागलो. माहीमच्या पॅरेडाईज जवळच्या अक्रम टेरेसमध्ये राहायचो आम्ही तेव्हा..!'



'घासलेट प्याला होता एकदा, जेमतेम सहा महिन्यांचा असेल तेव्हा! 'हे' (अब्बाजान) तेव्हा मोहन स्टुडिओत रेकॉर्डिंग करत होते.. काय मनःस्ताप झाला होता म्हणून सांगू? तो उणापूरा सात वर्षांचा असताना निवडणूकीच्या दिवसांत ओळखीतल्या काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांपैकी कुणीतरी त्याला ठाण्यातल्या एका प्रचार सभेत नेलं. तोपर्यंत झाकीर बऱ्यापैकी वाजवायला शिकला होता. झाकीरचा तो पहिला 'लाईव्ह' कार्यक्रम बरं का! उंची पुरत नव्हती म्हणून उशीवर मांड ठोकून त्याने तब्बल चाळीस मिनिटे तबलावादन केले! खूप कौतुक झालं. नंतर दिल्लीला आम्ही एका नात्यातल्या लग्नाला गेलो होतो. अनायासे दिल्लीतच पं. रविशंकरजींबरोबर यांचा कार्यक्रम होता. कुणीतरी त्यांच्या कानात कुजबुजलं होतं की हा छोकरा तबला झकास वाजवतो.. झालं! पं. रविशंकरजींनी आपल्या कार्यक्रमात सुरुवातीचा अर्धा तास झाकीरला वाजवायला सांगितलं. त्याचा 'लाईव्ह-सोलो' चालू असतानाच कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचं आगमन झालं. भारताचे तत्कालिन राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन हॉलमध्ये प्रवेश करत होते. झाकीर डोळे मिटून वाजवतच राहिला. पूर्ण सन्नाटा होता हॉलमध्ये. राष्ट्रपतींचा मान ठेवण्यासाठी सर्वजण उभे राहिले होते. तबल्याची लयकारी हॉलमध्ये

गुंजत होती. आपल्याच नावाशी साम्य असलेला हा गोड छोकरा, तहे दिलसे इतकं चांगलं वाजवतोय म्हणता ते जागीच थबकले ! खूपच रोमांचित झाले ते ! आगळं-वेगळं स्वागत झालं होतं राष्ट्रपतींचं ! .. मग काय ! मैफल जिंकली झाकीरने ! राष्ट्रपतींनी जवळ घेऊन त्याचं कौतुक केलं. उसका हौसला बढ गया ! झाकीरच्या वादनात त्यानंतर आपोआपच प्रगल्भता येऊ लागली. नंतरच्या दीडेक वर्षात त्याने बरीच प्रगती केली. बारा वर्षांच्या वयात त्याने चक्क उस्ताद अली अकबर खाँसाहेबांच्या सरोदवादनाच्या मैफिलीत ('म्युझियम' समोरचा हॉल!) तबलासाथ केली..' अम्मीजान त्या सगळ्या आठवणींनी मोहरल्या होत्या. मी अब्बाजानकडे पाहिलं. विलक्षण गंभीर, सात्विक भाव चेहऱ्यावर वागवत कुठल्याश्या आठवणीत दंग झाले होते. उजव्या हाताची बोटं मांडीवर ठेका देत कसलासा विचार करत असावेत. मला आश्चर्य वाटलं ! त्याक्षणी ते एखाद्या काश्मिरी हिंदूप्रमाणे भासले, तेजस्वी वाटले ! यवनी व्यक्तिमत्वाचा लवलेशच नव्हता. तबला वादनातील तो राकटपणा, रांगडेपणा औषधालाही नव्हता. अम्मीजानही टिपिकल मुस्लिम वेषभूषा परिधान केलेली पण चेहऱ्यावरचं तेज चक्क आपल्या कोकणस्थ ब्राह्मणी थाटाचं.. 'अब्बाजान, मजहबकी बात नही.. मगर आपण गुरूकुल पध्दती प्रमाण मानूनच संगीत-साधना केलीत ना ? गुरु-शिष्य परंपरा ही मुळात आर्य-संस्कृतीतली असताना आपल्या धर्माचं अवडंबर कधी आड नाही आलं ?' खळखळत्या झऱ्यासारखे दिलखुलास हसले अब्बाजान.. !




'तूम यकीन नही करोगे.. ! मी देवी सरस्वती आणि बुद्धि-देवता गणपती या देवतांना अगदी मनापासून मानतो ! मूर्तीपूजा नाही करत पण प्रणाम जरूर करतो ! आमच्या कलेत जातपात नसते ! इथे धर्माची अवडंबरं नसतात. मी प्रखर राष्ट्रवादी आहे ! तू पाहिलंच असेल ! आम्ही गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात सहभागी होतो. कार्यक्रम करतो ! पुण्याच्या दगडूशेठ हलवाईंच्या शतकमहोत्सवी उत्सवात आम्ही (अल्लारखाँ, फजल आणि झाकीर) चार दिवस कार्यक्रम केलेत ! तेथेही हेच सांगितलेलं मी. आमची ही कला देवी सरस्वती आणि गणेशापुढे नतमस्तक आहे. इतिहासच सांगायचा तर सात-आठशे वर्षांपूर्वी अरब देशातून खुष्कीच्या मार्गाने जगप्रवास करत 'ख़्वाजा मोईनुद्दीन चिश्ती' (ख़्वाजा गरीब नवाज) हे

सूफी पंथाचे संत भारतात आले. अजमेर हे त्यांचं स्थान आहे हे तुला माहीतच असेल! संत ज्ञानेश्वरांच्या काळातच या 'ख़्वाजा गरीब नवाजजींनी' जनजागृती आणि धर्मप्रसारार्थ कार्य केलं आहे. ते 'कौल' गात हिंडायचे. हातात मोठा डफ घेऊन सोबतच्या लवाजम्यासह 'इस्लाम'चं खरं रूप जनसामान्यांना कळावं म्हणून त्यांचं हे कार्य तुमच्या संतांइतकंच कळकळीचं असायचं. ख़्वाजांनी मुस्लिम धर्माबद्दल साध्या-सोप्या भाषेत कलाम लिहिले होते. तुमच्या ओव्या असतात तसाच हा लेखन-प्रकार! ख़्वाजांनीच 'सूफी' पंथाची स्थापना केली. त्यांच्या कार्याला खरा सन्मान मिळवून दिला तो अमीर खुसरूंनीच! अमीर खुसरू कोण? तर हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतात बऱ्याच मुस्लिम गायकांचं जसं योगदान आहे तसंच या अमीर खुसरूंचंही आहे. चतुरस्र कलावंत होता तो! हल्ली मृदुंग पहायलाही मिळत नाही पण त्याचं वादन करायचे अमीर खुसरू. या अमीर खुसरूंनीच मृदुंगाचे दोन भाग करून 'तबला' बनवला! देवी सरस्वतीच्या हातात दिसते त्या वीणेवर संशोधन करून 'सतार' बनवली. असो! रंगमंचावर चढण्याआधी पहिल्या पायरीला भक्तिभावाने नमस्कार करणे, रंगदेवतेची पूजा करणे, बुजुर्ग कलाकार समोर आले तर आदराने त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करणे हे आमच्या रक्तात आहे! देख! इथे तबले इतस्ततः पडलेले नाहीयत. उमेदवारीच्या काळात रेल्वेच्या तिसऱ्या दर्जाच्या प्रवासातही मी तबले कधीही जमिनीवर ठेवलेले नाहीत. जागा नसेल तर उभे राहून हातात किंवा बसल्यावर मांडीवर ठेवायचो मी! अरे, देवतुल्य आहेत ती साधनं! माझ्या सर्व शिष्यांनाही तीच शिकवण आहे..' अम्मीजान, खुर्शीदआपानेही अनुमोदन दिलं या वक्तव्यावर....

'अब्बाजान, यह 'तबला-तरंग' की कला आप की परंपरा में नही..!'.. 'एक मिनिटऽऽ एक मिनिट!..' इथे फजलभाई पहिल्यांदाच चर्चेत सहभागी होत म्हणाला.. 'तबलावादन आणि तबलातरंग' हे एकच आहेत अशी गल्लत करतात सामान्य लोक! गलत है यार! 'जल-तरंग', 'घुंगरू-तरंग' तसेच 'तबला-तरंग' हे वेगळेच विषय आहेत.. 'तबलावादन' हे 'रिदम-सेक्शन' मधलं.. तर 'तबलातरंग' याचा अंतर्भाव 'म्युझिक-सेक्शन' मध्ये होतो. तबलातरंग! यात तबला असला ना तरी त्याचं काम तिथे फक्त स्वरवाद्य म्हणून असतं. अर्थात त्यालाही तबलासाथ लागतेच. पण तबला-तरंगातला प्रत्येक तबला एक संवादी सूर म्हणून काम करतो! तो आमचा प्रांत नाही. आमचा रिश्ता.. फक्त आणि फक्त तबला शास्त्रीय वादन यांच्याशीच..!!'

'अब्बाजान, तुम्ही हिंदी चित्रपटांनाही संगीत दिलंय..'.. 'होय.. तब्बल तीस चित्रपटांना! अल्लारखाँ कुरेशी या नावाने!. ए. आर. कुरेशी या संक्षिप्त नावाने मी संगीत दिलंय! १९४३ला मुंबई आकाशवाणी सोडताच व्ही.एम्.व्यास यांचे 'माँ-बाप' (१९४४), 'महासती अनसुया' (१९४३), 'माँ बाप की लाज' (१९४६) , 'घर की शोभा' (१९४४), 'सबक' (१९५०), 'अरब का सितारा' (१९४६), 'मदारी' (पंजाबी) (१९५०), 'हातिमताई की बेटी' (१९५५), 'आलमआरा' (१९५६), नर्गिसच्या भावाने निर्मिलेला 'बेवफ़ा' (१९५२) असे अनेक सिनेमे केले. गायिका मिनू पुरुषोत्तम, जोहराबाई, अमीरबाई, लता, सुमन कल्याणपूर व आशा असायच्या तर पुरुष गायकांत जी.एम्. दुर्राणी, महंमद रफी, तलत, मुकेश, मन्नादा असायचे. वो 'समा' औरही था! जी.एम्. दुर्राणीने गायलेलं 'निसगमप रामजी

पमगरेसा..' तुफान गाजलं. राज कपूर, नर्गिस, अशोककुमार यांची भूमिका असलेल्या 'बेवफ़ा'मधली 'तुमको फुर्सत हो तो मेरी जान इधर देख लो..', व 'तू आए या ना आए..' ही तलतची गाणी (गीतकार शरशार सलानी) लोकप्रिय झाली. 'मदारी (पंजाबी)' या सिनेमातलं, 'रस्सी उत्ते टंगैया दुपट्टा..' (लता) छान जमून आलेलं. 'हातिमताई की बेटी' मध्ये महिपाल, कुमकुम, आणि चित्रा होते. रफी-आशा यांचं 'काली कमलीवाले तुझ पे लाखो सलाम..' हे गाणं जुन्या गाण्यांच्या शौकिनांच्या आजही ओठावर आहे. मी छोटीशी भूमिकाही केलेली 'महासती अनसुया'मध्ये..

'अब्बाजानजींचं मराठीतलं कार्यही खूप मोठं आहे हं..' खुर्शीदआपा सांगू लागली. 'पु.ल.देशपांडेसाहेब अब्बांचे गहिरे दोस्त होते. मुंबई आकाशवाणीपासूनचा हा दोस्ताना. अर्थात पुलंसाहेब 'ड्रामा' सेक्शनला आणि अब्बा 'म्युझिक' सेक्शनला होते. कै. बालगंधर्वसाहेबही अब्बांचे मित्रच. गडकऱ्यांचं 'एकच प्याला' नाटक करायचे. अर्धांगवायूमुळे त्यांनी ते सोडलं की काय. कृष्णराव चोणकरजी मग ती भूमिका करायचे. गंधर्वांची पत्नी गौहरबाई नायिकेच्या भूमिकेत असायची! तबल्यावर उस्ताद खाँ थिरकवा खाँसाहेब असायचे, पण त्या दिवशी बालगंधर्वजींच्या सांगण्यावरुन संपूर्ण नाटकभर अब्बाजाननीच वाजवलं, तेही केवळ एकाच तालिमीवर! (अब्बाजानजींच्या तबलासाथीनं 'प्रभू अजि गमला..', 'कशी या त्यजू पदाला..', 'झणी दे कर या दीना..', 'मज जन्म देई माता..' अशा एकेक पदांवर कसलं सॉलिड शर्करावगुंठण झालं असेल?) अरुण सरनाईक यांचा तबलावादक नायक म्हणून भूमिका असलेला 'रंगल्या रात्री अशा' (१९६२) हा सिनेमा आठवतो? संपूर्ण सिनेमात तबलावादनाचा प्लेबॅक आहे तो अब्बाजींचाच. त्यात अरुणजींनी अभिनयही झकास केलाय. संगीतकार होते छोटा गंधर्वजी, वसंत पवारजी आणि दत्ता डावजेकरजी!



'अब्बाजान, काही खास किस्से?..' 'किस्से तो बहोत है!.. रॉयल अल्बर्ट हॉल में प्रोग्राम था.. खूप सोफेस्टिकेटेड पब्लिक असते तिथे.. मध्ये मध्ये टाळ्या-शिट्ट्या असे प्रकार नसतात.. पण मी चॅलेन्ज देऊन तबला सोलोवर क्लॅप्स मिळवल्यात. 'वूडस्टॉक'च्या कार्यक्रमाला तर सुमारे तीन लाख लोक होते. पं.रविशंकरजी आणि मी स्टेजजवळ हेलिकॉप्टरने उतरलो. तू पं.रविशंकरजींची 'रागा' नावाची व्हिडिओ कॅसेट बघ. पारणं फिटेल डोळ्यांचं. तो मान काही आम्हा दोघांचाच असा नव्हता. भारतीय कलेला 'कुर्निसात' होता तो.. आयुष्यातली कमाई काय. तर मला बऱ्याच दिग्गजांबरोबर काम करायला मिळालं. पं. ओंकारनाथ ठाकूर, बडे गुलाम अली खाँ, नजाकत-सलामत अली खाँ,


उस्ताद हाफीज अली खाँ, अमजद अली खाँ, पं. रविशंकरजींचे गुरू उस्ताद अल्लाउद्दीन खाँ, पं. शिवकुमार शर्मा, नर्तक पं. गोपीकृष्ण, रोशनकुमारी.. किती नावं सांगू?..' मी अवाक् झालो होतो. 'आगे क्या सोचा है..काही योजना, इच्छा..' मी अम्मीजानकडे पाहत म्हटलं.

'योजना पुष्कळ आहेत. अभी इनके तो आराम करने की उमर है.. पण ऐकताहेत कुठे? आणखी एक वादकांची पिढी निर्माण करतो म्हणतायत. सध्याची शिवाजी पार्क जलतरण तलावाजवळची चारशे फुटांची छोटीशी जागा खूपच तटपुंजी आहे. आमची थोरामोठ्यात उठबस नाही. सरकारी नेत्यांना गोंजारणं रक्तात नाही. अर्ज केले पण तीन वर्षे झाली काहीच हालचाल नाहीय.. खरंतर सरकारनेच पुढाकार घ्यायला हवा.. हिंदुस्थानातल्या सर्वच बुजुर्गांना त्यांच्या-त्यांच्या हयातीत निकेतन उभारण्यासाठी सहाय्य करायला हवंय.. एवढं कार्य करून यांना मानसन्मान किती मिळाले माहित्येय? संगीत-नाट्य अकादमीचं ॲवॉर्ड, जम्मू-काश्मीर सोसायटीची सन्मान-चिन्हे, आणि सरकारने दिलेली 'पद्मश्री'.. बस्स! त्यांच्यापेक्षा ज्युनियर आणि त्यांचाच शागीर्द असलेल्या झाकीरलाही 'पद्मश्री' मिळाली. दोघांना एकच समान बक्षिस!?.. असो! आयुष्याच्या या टप्प्यावर त्याना दुसरे बहुमान हवेतच कशाला? लोकांनी मान दिलाय, प्रेम दिलंय याचीच शिदोरी खूप मोठी आहे..' उस्ताद अल्लारखाँजींची ही खंत मात्र मनावर ओरखडा कोरून गेली..

(पितृतुल्य सन्मा. अब्बाजानजींचं (उस्ताद अल्ला रखा खान साहेबांचं) दि. ३ फेब्रुवारी, २००० रोजी निधन झाले.)


© - अनंत पावसकर
(दै. सामना - 'फुलोरा पुरवणी' - दि. २२ जानेवारी, १९९४)

♥




सन्मा. अब्बाजानजी (उस्ताद अल्ला रखा खान साहेबांशी) संबंधित 'यू-ट्यूब' वर उपलब्ध असलेल्या 'व्हिडिओज'ची ही 'प्ले-लिस्ट'..

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94ac_-PIkr7BxFMgAw6gtVH&si=-HwJnEJHoXK8jBQJ




१. सन्मा. जिनियस 'उस्ताद जाकीर हुसैन' साहेबांशी संबंधित 'यू-ट्यूब' वरील ही 'प्ले-लिस्ट'.

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96P6yFU-zV8Kj0tr5TrRnuW&si=hEiytui4v0bO23_w





२. सन्मा. जिनियस 'उस्ताद तौफ़िक कुरैशी' साहेबांशी संबंधित 'यू-ट्यूब' वरील ही 'प्ले-लिस्ट'.

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi971EBZfOKqds0f9tlwFTyJz&si=dnf5fNKdTK6K5iGN




३. सन्मा. जिनियस 'उस्ताद फ़ज़ल कुरैशी' साहेबांशी संबंधित 'यू-ट्यूब' वरील ही 'प्ले-लिस्ट'.

[https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96d7LRaiFkMRFP_bi-0-q5c&si=0nUq2gt6zHLOLcaO](https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96d7LRaiFkMRFP_bi-0-q5c&si=0nUq2gt6zHLOLcaO)



♥

Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com

**For 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on [https://www.esahity.com](https://www.esahity.com) © - 'ई-साहित्य प्रतिष्ठान'**

'अनंत पावसकर' यांची प्रकाशित झालेली ही काही'ई-बुक्स'.. फक्त 'क्लिक' करा..







